# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

"१०० विद्यार्थ्यी प्रवेश क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय" व त्यास संलग्नित "४३० रुग्णखाटांचे रुग्णालय" तसेच "महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था" स्थापन करणेकरीताचा

# शासन निर्णय

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे
(१) १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रूग्णखाटांचे रूग्णालय स्थापन करणेबाबत.
(२) महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमईडी-२०२०/प्र.क्र.२१/२०/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक: ५ एप्रिल, २०२१.

प्रस्तावना:

जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांप्रमाणे १००० लोकसंख्येसाठी १ डॉक्टर असणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत राज्याच्या लोकसंख्येचा विचार केल्यास प्रति १००० लोकसंख्येमागे डॉक्टरांचे प्रमाण ०.६४ इतके म्हणजेच मानकांपेक्षा कमी आहे. राज्यात सध्या डॉक्टरांची कमतरता असल्यामुळे वैद्यकीय शिक्षण विभागातील व सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टरांची बहुतांश पदे रिक्त आहेत. त्यामुळे राज्याच्या निमशहरी, ग्रामीण, दुर्गम व अतिदुर्गम भागातील जनतेस आरोग्यविषयक प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात अडचणी निर्माण होतात. राज्याच्या लोकसंख्येत झालेली वाढ आणि वैद्यकीय शिक्षणाबाबत तसेच आरोग्य सुविधेबाबत निर्माण झालेली जागरुकता लक्षात घेता नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरु करणे गरजेचे आहे.

तसेच, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याशी संलग्नित बऱ्याचशा शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी विनाअनुदानित संस्थांद्वारे विविध आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम राबविण्यात येतात. तथापि, अद्याप विद्यापीठाची स्वत:ची पदवी आणि पदव्युत्तर संस्था स्थापन होवू शकली नाही. त्यानुषंगाने, राज्यातील उपलब्ध वैद्यकीय सुविधांचा विचार करता, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रूग्णखाटांचे रूग्णालय स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

यासोबतच वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत अत्याधुनिक अतिविशेषोपचार आरोग्य सेवा व संशोधनास चालना देण्यासाठी महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्यानुषंगाने सदर प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यास दिनांक १०.०२.२०२१ रोजीच्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

केंद्र शासन व राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग यांच्या मान्यतेच्या अधीन राहून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रूग्णखाटांचे रूग्णालय स्थापन करण्यास याद्वारे शासन मान्यता देत आहे.

२. तसेच पदवी अभ्यासक्रमासाठीच्या पायाभूत सुविधांच्या आधारावर वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत अत्याधुनिक अतिविशेषोपचार आरोग्य सेवा व संशोधनास चालना देण्यासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे "**महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था**" स्थापन करण्यास देखील याद्वारे शासन मान्यता देत आहे.

**३. (अ) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रूग्णखाटांचे रूग्णालय स्थापन करणे.**

(१) सदर वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित रुग्णालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अधिनस्त स्थापन करण्यात येईल. तसेच, सदर महाविद्यालय व रुग्णालय, दैनंदिन परिचालन व व्यवस्थापन यासाठी स्वायत्त संस्था म्हणून कार्यरत राहील.

(२) सदर वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित रुग्णालय यासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक हे सर्वसाधारण पर्यवेक्षण, व्यवस्थापन व नियंत्रण करणारी यंत्रणा असेल.

(३) तसेच, सदर वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित रुग्णालय यासाठीच्या सर्व आस्थापना विषयक बाबी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने हाताळण्यात येतील.

(४) तसेच, सदर महाविद्यालय, संलग्नित रूग्णालय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांचे अधिकारक्षेत्र व जबाबदाऱ्या याबाबत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी चर्चा करून अंतिम करून याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

(५) प्रस्तावित वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांप्रमाणे आवश्यक जागा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या परिसरामध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल.

(६) नवीन वैद्यकीय महाविद्यालयाकरीता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांप्रमाणे आवश्यक असलेले सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय, नाशिक हे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास तात्पुरत्या स्वरूपात नि:शुल्क वापरास उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(७) (अ)प्रस्तावित वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयासाठी विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकुण सुमारे रुपये ६२७.६२ कोटी (अनावर्ती खर्च सुमारे रूपये ३८३.११ कोटी व प्रथम चार वर्षांसाठी आवर्ती खर्च सुमारे रूपये २४४.५१ कोटी) इतका खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत उपलब्ध करावयाच्या अनावर्ती व प्रथम चार वर्षांसाठी आवर्ती खर्चापोटी आवश्यक निधीचे प्रमाण ठरविण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून त्यामार्फत विद्यापीठासमवेत चर्चा करून अंतिम करण्यात येईल.

(ब) तसेच विवरणपत्र "ब" मध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियमाच्या तरतुदीनुसार विद्यापीठामार्फत अभ्यासक्रमाचे व इतर शुल्क निश्चीत करून आकारणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(क) प्रस्तावित वैद्यकीय महाविद्यालयासाठी विवरणपत्र "ब" मध्ये नमूद केल्याप्रमाणे शुल्क व इतर बाबींमार्फत निर्माण होणाऱ्या उत्पन्नाच्या स्त्रोतामार्फत महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयाचे व्यवस्थापन, संचालन इत्यादी सर्वप्रकारच्या आवर्ती खर्चासाठी (वेतनासह) कायमस्वरूपी तरतूद महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत करण्यात येईल.

(ड) उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेची अट शिथील करून या महाविद्यालयासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र "क" मध्ये दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत शासन मान्यतेने आवश्यक पदनिर्मिती करण्यास आणि विद्यापीठास पदे भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(इ) उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेची अट शिथील करून सदर महाविद्यालयाशी संलग्नित अनुषंगिक रुग्णालयासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र "ड" मध्ये दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत शासन मान्यतेने आवश्यक पदनिर्मिती करण्यास आणि विद्यापीठास पदे भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(८) या महाविद्यालय व अनुषंगिक रुग्णालयासाठी आवश्यक तसेच अतिरिक्त बांधकाम व बांधकाम खर्चास विवरणपत्र "इ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

(९) याशिवाय, केंद्रीय वित्त मंत्रालयाने नव्याने घोषित केलेल्या Viability Gap Funding (VGF) Scheme या योजनेमध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठास खाजगी भागीदार गृहीत धरून सदर वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय उभारणीसाठी उप-योजना-२ अंतर्गत अनावर्ती खर्चासाठी ४० टक्के व्यवहार्यता तफावत निधी (Viability Gap Funding) उपलब्ध करून देण्याबाबत आणि प्रथम पाच वर्षांसाठी आवर्ती खर्चासाठी २५ टक्के व्यवहार्यता तफावत

निधी (Viability Gap Funding) उपलब्ध करून देण्याबाबत केंद्र शासन / निती आयोगास "नाविण्यपूर्ण विशेष बाब" म्हणून प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(१०) या महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयांकरिता आवश्यक असणारी स्वच्छता, आहार, सुरक्षा, वस्त्र स्वच्छता ही सर्व कामे बाह्यस्त्रोतामार्फत राबविण्यास परवानगी देण्यात येत आहे. सदरची कामे शासनाच्या विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने जाहीर निविदा प्रक्रियेमार्फत ठेकेदारांची नियुक्ती करुन घेण्यात यावीत.

**(ब) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे वैद्यकीय पदव्युत्तर पदवी संस्था स्थापन करणे.**

(१) सदर वैद्यकीय पदव्युत्तर पदवी संस्थेचे नाव "महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक" असे राहील.

(२) सदर संस्था ही राज्यातील "उत्कृष्टता केंद्र" (Center of Excellence) म्हणून स्थापन करण्यात येऊन ह्या संस्थेमार्फत वैद्यकीय शिक्षण अध्यापनाची पध्दत विकसीत करण्यात येईल. तसेच विविध शाखांतील वैद्यकीय विशेषज्ञांची निर्मिती करण्यावर सदर संस्थेचा भर राहील, जेणेकरुन या विशेषज्ञांमार्फत आरोग्य क्षेत्रात करण्यात येणाऱ्या सखोल संशोधनाद्वारे वैद्यकीय ज्ञानाची क्षितीजे विस्तारण्यास मदत होईल.

(३) सदर संस्थेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे राहतील:-

(अ) उच्च प्रतीची रुग्ण सेवा उपलब्ध करुन देणे.

(ब) पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणामध्ये स्वयंपूर्णता प्राप्त करणे.

(क) उच्च पात्रता प्राप्त वैद्यकीय शिक्षकांची राज्याची गरज पूर्ण करणे.

(ड) आरोग्य उपक्रमाच्या सर्व महत्त्वाच्या शाखातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी शैक्षणिक सुविधा पुरविणे.

(इ) समाजाची सेवा व गरजूंची काळजी या दृष्टीकोनातून वैद्यकीय क्षेत्रात मुलभूत संशोधन करणे.

(४) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, येथील नवीन वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित रुग्णालयाच्या ठिकाणी विवरणपत्र "फ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे १५ विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची ६४ विद्यार्थी प्रवेशक्षमता राहील.

४. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.७/१४७५, दि. ०७.०१.२०२१ रोजीच्या अभिप्रायानुसार व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २३/२०२१/व्यय-१३, दि. ०८.०१.२०२१ रोजीच्या अभिप्रायानुसार आणि मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १०.२.२०२१ रोजीच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३०९१६२४१७६०१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRINIVAS PUNDALIKRAO KOTWAL

Digitally signed by SHRINIVAS PUNDALIKRAO KOTWA
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=d32b061d22e577cf43207f6a86cadc4ce1798dd3b3fb5ef54c3051c62, postalCode=400001,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=30ec04f686f0e87515c68a42bc5df9353ef1a35539184495da3e943c6, ou=NA, o=GOVERNMENT MAHARASHTRA, cn=SHRINIVAS PUNDALIKRAO KOTW
Date: 2021.04.05 17:00:13 +05'30'

(डॉ.श्री.पु.कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
८. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
९. मा.राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, निर्माण भवन, नवी दिल्ली.
११. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, मंत्रालय, मुंबई.
१४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१५. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
१६. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
१७. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (पाच प्रती)
१८. जिल्हाधिकारी, नाशिक.
१९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ / २ महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
२०. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.
२१. अधीक्षक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक.
२२. जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, नाशिक.

२३. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये.

२४. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२५. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

२६. निवडनस्ती (शिक्षण-१).

शासन निर्णय क्रमांकः एमईडी-२०२०/प्र.क्र.२१/२०/शिक्षण-१, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
दिनांक : ०५ एप्रिल, २०२१ सोबतचे सहपत्र

विवरणपत्र "अ"

महाविद्यालय व रूग्णालय स्थापनेचा चार वर्षाचा एकूण खर्च

(रुपये कोटी)

| अ. क्र. | खर्चाचा तपशिल | प्रथम वर्ष | द्वितीय-वर्ष | तृतीय वर्ष | चतुर्थ वर्ष | महाविद्यालय व रुग्णालयाचा खर्च (अंदाजित) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | इमारत व बांधकाम | ९१.०० | ७९.०० | ७४.०० | १९.११ | २६३.११ |
| २. | यंत्र सामुग्री उपकरणे | २६.०० | २८.०० | ३५.०० | ३१.०० | १२०.०० |
| | **एकुण अनावर्ती खर्च** | **११७.००** | **१०७.००** | **१०९.००** | **५०.११** | **३८३.११** |
| ३. | महाविद्यालयीन अधिकारी व कर्मचारी | १५.२५ | २४.५६ | २७.९६ | २९.८३ | ९७.६० |
| ४. | रुग्णालयीन अधिकारी व कर्मचारी | १३.१२ | २३.८८ | २९.७१ | ३३.८६ | १००.५७ |
| ५. | आवर्ती खर्च (दैनंदिन) | ५.८७ | ७.५१ | ८.६२ | ९.०३ | ३१.०३ |
| ६. | बाह्य स्त्रोत खर्च | ३.८६ | ३.८५ | ३.८१ | ३.७९ | १५.३१ |
| | **एकूण आवर्ती खर्च** | **३८.१०** | **५९.८०** | **७०.१०** | **७६.५१** | **२४४.५१** |
| | **एकूण (आवर्ती+अनावर्ती) खर्च** | **१५५.१०** | **१६६.८०** | **१७९.१०** | **१२६.६२** | **६२७.६२** |

विवरणपत्र-"ब"

वार्षिक टप्प्यांनुसार मिळणारे उत्पन्न (रुपये कोटी)

| उत्पन्न स्रोत | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | चौथे वर्ष | पाचवे वर्ष | नियमित मान्यतेनंतर |
|---|---|---|---|---|---|---|
| एम बी बी एस विद्यार्थी शुल्क | १२ | २४ | ३६ | ४८ | ४८ | ४८ |
| वसतिगृह शुल्क | ०.२५ | ०.५० | ०.७५ | १.० | १.० | १.० |
| पदव्युत्तर विद्यार्थी शुल्क (१५ विषयातील ६४ विद्यार्थी प्रमाणे) | | ७.६८ | १५.३६ | २३.०४ | २३.०४ | २३.०४ |
| **एकूण** | **१२.२५** | **३२.१८** | **५२.११** | **७२.०४** | **७२.०४** | **७२.०४** |

खर्च व उत्पन्न यांचा तुलनात्मक तक्ता

| | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | दुसरे वर्ष | चौथे वर्ष | पाचवे वर्ष* | नियमित मान्यतेनंतर* |
|---|---|---|---|---|---|---|
| खर्च | १५५.१० | १६६.८० | १७९.१० | १२६.६२ | ७६.५१ | ७६.५१ |
| उत्पन्न | १२.२५ | ३२.१८ | ५२.११ | ७२.०४ | ७७.०४ | ७७.०४ |
| खर्च व उत्पन्न यातील तफावत | -१४२.८५ | -१३४.६२ | -१२६.९९ | -५४.५८ | ०.५३ | ०.५३ |

## विवरणपत्र "क"

### महाविद्यालयाकरिता आवश्यक पदे व त्यावरील चार वर्षाचा अंदाजित खर्च

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | संवर्ग | | महाविद्यालयास आवश्यक पदे व अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| १. | वर्ग-१ | पदे | ४८ |
| | | खर्च | ४४.३१ |
| २. | वर्ग-२ | पदे | ४४ |
| | | खर्च | १७.९० |
| ३. | विद्यावेतनाची पदे | पदे | ५९ |
| | | खर्च | १३.९९ |
| ४. | वर्ग-३(नियमित पदे) | पदे | ९३ |
| | | खर्च | १४.६३ |
| ५. | काल्पनीक पदे वर्ग-३ (बाह्यस्त्रोताने) | पदे | १३९ |
| | | खर्च | ४.८९ |
| ६. | वर्ग-४ (कंत्राटी) | पदे | ६५ |
| | | खर्च | १.८८ |
| | एकूण | पदे | ४४८ |
| | | खर्च | ९७.६० |

## विवरणपत्र "ड"

### रुग्णालयाकरिता आवश्यक पदे व त्यावरील चार वर्षाचा अंदाजित खर्च

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | संवर्ग | | रुग्णालयास आवश्यक पदे व अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| १. | वर्ग-१ | पदे | ३ |
| | | खर्च | १.२४ |
| २. | वर्ग-२ | पदे | १४ |
| | | खर्च | ३.९० |
| ३. | वर्ग-३ (नियमित पदे) | पदे | ५०३ |
| | | खर्च | ८१.५६ |
| ४. | काल्पनीक पदे वर्ग-३ (बाह्यस्त्रोताने) | पदे | ३७ |
| | | खर्च | १.४५ |
| ५. | वर्ग-४ (कंत्राटी) | पदे | ४२९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | खर्च | १२.४२ |
| | एकूण | पदे | ९८६ |
| | | खर्च | १००.५७ |

## विवरणपत्र "इ"

महाविद्यालय व रूग्णालयाकरिता आवश्यक बांधकामावरील चार वर्षाचा अंदाजित खर्च

(रुपये कोटी)

| अ. क्र. | इमारतीचे स्वरुप | आवश्यक बांधकाम | खर्च प्रति चौरस मिटर | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय इमारत (महाविद्यालय) | ६४५० चौ.मी. | ४३६८०.०० (२७,३००.०० बांधकाम खर्च+ ६० टक्के अनुषंगीक खर्च मिळून एकूण बांधकाम खर्च) | २८.१७ |
| २. | अचिकित्सालयीन व चिकित्सालयीन विभाग | ३०३६ चौ.मी. | ४३६८०.०० | १३.२६ |
| ३. | रुग्णालयीन इमारत | २१३२३ चौ.मी. | ४३६८०.०० | ९३.१३ |
| ४. | अधिकारी/कर्मचारी आवास आणि विद्यार्थी वसतिगृह | २१५७५ चौ.मी. | ४३६८०.०० | ९४.२३ |
| ५. | आवश्यकतेनुसार अतिरिक्त बांधकाम (१५ टक्के) | ७८५८ चौ.मी. | ४३६८०.०० | ३४.३२ |
| | एकूण | ६०२४२ चौ.मि. | | २६३.११ |

## विवरणपत्र "फ"

## पदव्युत्तर पदवी संस्थेतील विषय व विद्यार्थी प्रवेश क्षमता

| अ.क्र. | विषय | विद्यार्थी प्रवेश क्षमेते |
|---|---|---|
| ०१. | औषध शास्त्र (MD Medicine) | ०६ |
| ०२. | बालरोग चिकीत्सा शास्त्र (MD Paediatrics) | ०४ |
| ०३. | शल्य चिकित्सा शास्त्र (MS General Surgery) | ०६ |
| ०४. | अस्थिरोग शास्त्र (MS Orthopaedics) | ०४ |
| ०५. | कान नाक घसा शास्त्र (MD ENT) | ०४ |
| ०६. | नेत्रचिकित्सा (MS Ophthalmology) | ०४ |
| ०७. | क्ष-किरण शास्त्र (MD Radiodignosis) | ०४ |
| ०८. | भुल शास्त्र (MD Anaesthesia) | ०६ |
| ०९. | स्त्रीरोग चिकित्सा व प्रसुती शास्त्र (MS OBGY) | ०६ |
| १०. | त्वचारोग शास्त्र (MD Dermatology) | ०४ |
| ११. | रोगनिदान शास्त्र (MD Pathology) | ०६ |
| १२. | सुक्ष्मजिव शास्त्र (MD Microbilology) | ०४ |
| १३. | जैवरसायन शास्त्र (MD Biochemistry) | ०२ |
| १४. | औषध निर्माण शास्त्र (MD Pharmacology) | ०२ |
| १५. | न्यायवैद्यक औषध शास्त्र (MD Forensic Medicine) | ०२ |
| | एकूण | ६४ |